# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:-१८ एप्रिल, २०२२

---

जळगाव दि.१८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. प्रवेशपूर्व (पेट) परीक्षांना आज सोमवार दि.१८ एप्रिल पासून सुरळीत प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी ८१८ विद्यार्थ्यांपैकी ५३५ विद्यार्थ्यांनी पेटची ऑनलाईन परीक्षा दिली.

दिनांक १८ ते २२ एप्रिल पर्यंत विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा केंद्रात या परीक्षा आयोजित करण्यात आल्या आहेत. एकुण ३ हजार ६८८ विद्यार्थी या परीक्षेसाठी बसले आहेत. यासर्व परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेतल्या जात असून त्यासाठी २५० संगणकांची व्यवस्था करण्यात आली आहे. एका दिवसात ४ बॅचेसमध्ये या परीक्षा होत आहेत. सोमवार दि.१८ एप्रिल रोजी या परीक्षा केंद्राला कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी भेट देऊन पाहणी केली. परीक्षा सुरळीत सुरु असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. त्यांच्या समवेत प्रभारी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे उपस्थित होते. दिवसभरात चार बॅचेससाठी ८१८ विद्यार्थ्यांची नोंदणी होती. त्यापैकी ५३५ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते. पहिल्या दिवशी वनस्पतीशास्त्र, अर्थशास्त्र, रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, प्राणीशास्त्र आणि मानसशास्त्र या सहा विषयांच्या परीक्षा झाल्या. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडून करण्यात आलेल्या परीक्षेच्या व्यवस्थेबद्दल समाधान असल्याच्या प्रतिक्रिया दिल्या. केंद्रप्रमुख म्हणून प्रा. पी.पी.माहुलीकर हे काम पहात असून मुख्य समन्वयक प्रा.समीर नारखेडे तर समन्वयक डॉ.मनोज पाटील आणि प्रशासकीय अधिकारी म्हणून सहायक कुलसचिव व्ही.व्ही. तळेले आणि तांत्रिक अधिकारी म्हणून दाऊदी हुसेन काम पहात आहेत.

## बातमी क्र.२

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) शहादा येथे १९ एप्रिल पासून सुरु होणाऱ्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. उद्या मंगळवारी सहभागी संघांची प्रत्यक्ष नोंदणी होणार असून बुधवार दि. २० एप्रिल रोजी सकाळी युवक महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे.

हा युवकमहोत्सव शहादा येथील पूज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाचे औषध निर्माणशास्त्र तसेच कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. मंगळवार दि. १९ एप्रिल रोजी विविध महाविद्यालयांच्या संघांचे आगमन होईल. संघांची नोंदणी करण्यासाठी नोंदणी कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. रात्री ८ वाजता सर्व संघव्यवस्थापकांची सभा भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. उन्हाची तिव्रता लक्षात घेवून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्टेजवर कुलरची व्यवस्था, वैद्यकीय पथक, सुरक्षा, तसेच विद्यार्थ्यांसाठी ग्लुकोज (ओ.आर.एस.) व्यवस्था आयोजक महाविद्यालयांकडून करण्यात येणार आहे. उन्हाची तिव्रता लक्षात घेवून शोभा यात्रा रद्द करण्यात आली आहे. तसेच दु. १२ ते ४ या वेळेस खुल्या रंगमंचावर स्पर्धा होणार नाहीत. बुधवार दि. २० रोजी सकाळी ८ वाजता कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते उद्घाटन होईल. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष दीपक पाटील राहतील. आ.राजेश पाडवी, संस्थेचे उपाध्यक्ष जगदीश पाटील, व्य.प.सदस्य दिलीप पाटील, जि.प. सदस्या जयश्री पाटील आदी प्रमुख अतिथी म्हणून हजर राहणार आहेत अशी माहिती प्रभारी कुलसचिव प्रा. के.एफ.पवार, कार्याध्यक्ष दीपक पाटील,

विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ.सुनील कुलकर्णी, समन्वयक मकरंद पाटील, डॉ.आय.जे.पाटील, प्राचार्य डॉ.एस.पी.पवार, प्राचार्य डॉ.आर.एस.पाटील यांनी दिली. १०४ महाविद्यालयांनी महोत्सवासाठी नोंदणी केली आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय देनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी